https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on

सांध्य दैनिक
# विदर्भ प्रजासत्ताक

Q R कोड स्कॅन करा व आमच्या ग्रुप ला जॉईन व्हा!

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - ३ रे ❑ अंक - २४७ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ शनिवार दि. १ नोव्हेंबर २०२५ ❑ संपादक - डॉ. शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -५

## आंध्र प्रदेशच्या व्यंकटेश्वर स्वामी मंदिरात
## चेंगराचेंगरीत १० भक्तांचा मृत्यू


PTI

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१श्रीकाकुलम**

**आंध्र प्रदेश** आंध्र प्रदेशातील श्रीकाकुलम जिल्ह्यात एक दुर्दैवी अपघात घडला असून, काशी बुग्गा वेंकटेश्वर स्वामी मंदिरात झालेल्या चेंगराचेंगरीत किमान नऊ भाविकांचा मृत्यू झाला. या घटनेत अनेक जण जखमी झाल्याचेही वृत्त आहे. यापैकी काही जखमींची प्रकृती चिंताजनक असून, त्यामुळे मृतांचा आकडा वाढण्याची भीती अधिकाऱ्यांनी व्यक्त केली आहे. सध्या या परिसरात मदत आणि बचाव कार्य सुरू आहे.

मीडिया रिपोर्ट्सनुसार, शनिवारी एकादशीनिमित्त वेंकटेश्वर स्वामी मंदिरात भाविकांची मोठी गर्दी जमली होती. मंदिर संकुलाच्या प्रवेशद्वाराजवळ अचानक गर्दी वाढली, ज्यामुळे भविकांमध्ये घबराट निर्माण झाली आणि चेंगराचेंगरी सदृश्य परिस्थिति निर्माण झाली. घटनेनंतर स्थानिक प्रशासन आणि पोलिस तातडीने घटनास्थळी पोहोचले आणि मदत आणि बचाव कार्य सुरू केले.





कार्तिक महिन्याच्या एकादशीनिमित्त मंदिरात प्रचंड गर्दी झाली होती. गर्दीमुळे मंदिरातील रेलिंग कोसळली, ज्यामुळे गोंधळ उडाला आणि लोक एकमेकांवर पडले. मंदिराच्या प्रवेशद्वाराजवळ हा अपघात झाला. समोर आलेल्या व्हिडीओ आणि फोटोंवरून असा अंदाज आहे की, मृतांमध्ये बहुतेक महिला आहेत.परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी पोलिस कर्मचारी आणि आपत्कालीन पथके घटनास्थळी पोहोचली आहेत. गर्दी नियंत्रित करण्यासाठी आणि मदत कार्य जलद करण्यासाठी अतिरिक्त पोलिस दल तैनात करण्यात आले आहे. घटनेनंतर राज्याचे कृषी मंत्री के.अचन्नायडू देखील लगेच मंदिरात पोहोचले आणि मंदिर व्यवस्थापन अधिकाऱ्यांची भेट घेतली.आंध्र प्रदेशचे मुख्यमंत्री एन. चंद्राबाबू नायडू म्हणाले, श्रीकाकुलम जिल्ह्यातील काशीबुग्गा वेंकटेश्वर मंदिरात झालेल्या चेंगराचेंगरीमुळे खळबळ उडाली आहे. या दुर्दैवी घटनेत जीवितहानी झाल्याचे ऐकून अत्यंत दुःख झाले आहे. मी मृतांच्या कुटुंबियांबद्दल माझ्या संवेदना व्यक्त करतो. मी अधिकाऱ्यांना जखमींना सर्वोत्तम उपचार देण्याचे निर्देश दिले आहेत आणि स्थानिक अधिकारी व लोकप्रतिनिधींना घटनास्थळी भेट देऊन मदत कार्यावर लक्ष ठेवण्यास सांगितले आहे.

## सत्याचा मोर्चात काँग्रेस विरुद्ध काँग्रेस

### पक्षाचा अधिकृत संदेश न आल्याने कार्यकर्ते गोंधळले; महाराष्ट्र काँग्रेसमधील मतभेद उघडकीस

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१मुंबई–** महाराष्ट्राच्या राजकीय पटावर आजचा दिवस ऐतिहासिक ठरणार आहे. सत्याचा मोर्चा या आंदोलनाच्या निमित्ताने महाराष्ट्रातील प्रमुख विरोधी पक्ष एकाच व्यासपीठावर येत आहेत. महाविकास आघाडीच्या नेतृत्वाखाली या मोर्चात राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार, शिवसेना ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे हे एकत्र येत आहेत. मतदारयाद्यांतील कथित अनियमितता आणि मतचोरीच्या आरोपांविरोधात हा मोर्चा काढण्यात आला असून, तो फॅशन स्ट्रीटपासून सुरु होऊन मुंबई महानगरपालिका मुख्यालयावर धडकणार आहे. या मोर्चाला प्रचंड जनसमर्थन मिळेल, असा दावा आयोजकांनी केला आहे. मात्र, या आंदोलनाच्या राजकीय पार्श्वभूमीवर काँग्रेसमधील मतभेदांनी महाविकास आघाडीतील एकात्मतेवर प्रश्नचिन्ह निर्माण केले आहे. मोर्चासाठी जय्यत तयारी सुरू असून, मुंबई महानगर पालिकेच्या मुख्यालयासमोर व्यासपीठाची उभारणी पूर्ण झाली आहे. कार्यकर्त्यांच्या गर्दीमुळे परिसरात पोलीस बंदोबस्त वाढवण्यात आला आहे. उद्धव ठाकरे, शरद



पवार आणि राज ठाकरे यांचे एकत्र येणे हे स्वतःमध्येच एक मोठे राजकीय चित्र मानले जात आहे. या तिन्ही नेत्यांनी वेगवेगळ्या विचारसरणी आणि राजकीय इतिहासातून प्रवास केला असला तरी, मतदारयादीतील घोळ आणि प्रशासनाच्या भूमिकेविरोधात त्यांनी एकत्र येण्याचा निर्णय घेतला आहे. सत्याचा मोर्चा केवळ मतदारयादीविषयीचा आंदोलन नसून, आगामी निवडणुकीपूर्वी विरोधकांच्या एकजुटीचा दाखला म्हणूनही पाहिला जात आहे. मात्र, या आंदोलनात काँग्रेस पक्षाच्या भूमिकेमुळे महाविकास आघाडीतील सुसंवादावर सावली पडली आहे. मुंबई काँग्रेस आणि महाराष्ट्र काँग्रेस यांच्यातील मतभेद उघडकीस आले असून, कार्यकर्त्यांमध्ये सहभागी होण्याबाबत संभ्रम निर्माण झाला आहे. महाराष्ट्र काँग्रेसकडून मोर्चाला पाठिंबा जाहीर करण्यात आला असला तरी मुंबई काँग्रेसने अधिकृत संदेश न पाठविल्यामुळे स्थानिक कार्यकर्ते गोंधळले आहेत.

## सत्याचा मोर्चा विरोधाचा नव्हे, जागृतीचा - जबाबदारीचा आवाज

### शरद पवारांकडून ऐतिहासिक संदर्भ देत संयुक्त महाराष्ट्र आंदोलनाशी तुलना

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१मुंबई–** मुंबईत आज मतदार याद्यांमधील घोळ, मतचोरी आणि दुबार नावे या गंभीर मुद्द्यांवरून उसळलेल्या जनक्षोभाच्या पार्श्वभूमीवर सत्याचा मोर्चा निघाला. महाविकास आघाडी आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेना एकत्र येत राज्य निवडणूक आयोगाच्या विरोधात हे आंदोलन छेडले. हजारोंच्या संख्येने कार्यकर्त्यांनी फॅशन स्ट्रीटपासून मुंबई महानगरपालिका मुख्यालयापर्यंत रॅली काढली. मतदार नोंदणी प्रक्रियेत झालेल्या कथित अनियमिततेविरोधात आणि पारदर्शक निवडणुकीच्या मागणीसाठी हा मोर्चा काढण्यात आला होता. या ऐतिहासिक मोर्चात राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गट, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष, काँग्रेस आणि मनसेचे नेते एकाच व्यासपीठावर एकत्र आल्याने महाराष्ट्राच्या राजकारणात नवा संदेश गेला आहे.

मोर्चातील मार्गदर्शनपर भाषणात राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांनी लोकशाहीच्या रक्षणाचा मुद्दा पुढे करत कार्यकर्त्यांना एकजुटीचा संदेश दिला. देशाची लोकशाही टिकवण्यासाठी कष्ट करायला तयार असलेले तुम्ही सर्व बंधू-भगिनी, तुमचा हा संघर्ष मला इतिहासाची आठवण करून देतो, असं सांगत त्यांनी या आंदोलनाला ऐतिहासिक संदर्भ जोडला. पवार म्हणाले की, आजचा मोर्चा मला १९७८-८९ च्या काळात घेऊन जातो. त्या काळात मी महाविद्यालयात शिकत होतो. संयुक्त




महाराष्ट्र आंदोलनाच्या वेळी काळा घोडा परिसरात असेच मोर्चे निघाले होते. त्या काळातील एकजूट आणि विचारांचा समन्वय आज तुमच्यात दिसत असल्याचे शरद पवार यांनी म्हटले आहे.

शरद पवारांनी स्पष्ट शब्दांत सांगितले की, आजचा मोर्चा हा कोणत्याही पक्षासाठी सत्ता मिळवण्याचा प्रयत्न नसून लोकशाही रचनेच्या रक्षणासाठीचा सामूहिक आवाज आहे. आपण स्वतःसाठी काही मागत नाही, सत्ता किंवा पदासाठीही नाही. आपण फक्त एवढंच म्हणतोय की संविधानाने दिलेले मतदानाचे अधिकार सुरक्षित राहिले पाहिजेत, असं ते म्हणाले. निवडणूक आयोगावर अप्रत्यक्ष टीका करत त्यांनी प्रश्न उपस्थित केला की, संविधानात सांगितलेले नियम सत्ताधाऱ्यांच्या मनाप्रमाणे वाकवले गेले तर लोकशाहीचं भविष्य धोक्यात येईल. त्यामुळे, जनतेने सावध राहून निवडणुकीच्या प्रक्रियेत पारदर्शकता राखण्यासाठी दबाव निर्माण करण्याची गरज असल्याचं त्यांनी नमूद केलं.सत्याचा मोर्चा हा फक्त विरोधाचा नव्हे, तर जागृतीचा आणि जबाबदारीचा आवाज मोर्चाच्या अखेरीस शरद पवारांनी सर्व कार्यकर्त्यांना शांततेच्या मार्गाने लोकशाहीच्या रक्षणासाठी लढा देण्याचं आवाहन केलं. ही लढाई कुणा एका पक्षाची नाही, ही लढाई संविधान आणि लोकशाही वाचवण्याची आहे, असा ठाम संदेश त्यांनी दिला. सत्याचा मोर्चा हा फक्त विरोधाचा नव्हे, तर जागृतीचा आणि जबाबदारीचा आवाज असल्याचं ते म्हणाले. या मोर्चातून राज्यभरात लोकशाही आणि निवडणूक प्रक्रियेतील पारदर्शकतेचा मुद्दा पुन्हा केंद्रस्थानी आला असून, निवडणूक आयोगावर दबाव वाढवण्यात महाविकास आघाडी आणि मनसेला यश मिळाल्याचं म्हटलं जात आहे.

## पुढील आठवड्यात नगरपालिका निवडणुकीची घोषणा होणार

### २१ दिवसात प्रक्रिया पार पडणार

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१मुंबई** पुढील आठवड्यात नगरपालिका निवडणुकीची घोषणा होण्याची शक्यता आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये पहिल्या टप्प्यात राज्यातील २४६ नगरपालिका, ४२ नगरपंचायतीची निवडणूक पार पडणार आहे. २१ दिवसात निवडणूक प्रक्रिया पार पडताना तात्काळ दुसऱ्या टप्प्यात जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुकीची सुद्धा घोषणा निवडणूक आयोगाकडून केली जाऊ शकते. तर शेवटच्या टप्प्यात महापालिका निवडणुकीची घोषणा होण्याची शक्यता आहे.

दरम्यान, महापालिका, नगरपालिका, नगर पंचायती, जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुका तीन टप्प्यांत पार पाडण्याचे नियोजन करण्यात आले आहे. नगरपालिका आणि पंचायतीच्या निवडणुकीसाठी नोव्हेंबरमध्ये मतदान होईल. नगरपालिका निवडणुकीची घोषणा सोमवारी किंवा मंगळवारी केली जाण्याची शक्यता वर्तविली जाते. यामुळे राज्यात आचारसंहिता लागू होईल.

मुंबईसह राज्यातील २९ महापालिकांच्या निवडणुका १५ ते २० जानेवारी २०२६ च्या आत घेण्याचा घेण्याचा आयोगाचा प्रयत्न राहणार आहे. नगरपालिका आणि नगरपंचायतींच्या निवडणुकांसाठी नोव्हेंबरमध्ये मतदान होईल. नगरपालिका निवडणुकीची प्रक्रिया सुरू असताना किंवा मतदानानंतर लगेच जिल्हा परिषदा आणि पंचायत समितीच्या निवडणुकांचे वेळापत्रक जाहीर केले जाईल. अतिवृष्टी आणि पुरामुळे सरकारी



यंत्रणा अजूनही ग्रामीण भागातील मदतकार्यात गुंतलेली आहे. त्यामुळे या निवडणुका डिसेंबरमध्ये होणार असल्याचे खात्रीलायकरित्या समजते. जिल्हा परिषद निवडणुकीची प्रक्रिया सुरु असतानाच महापालिका निवडणुकांची घोषणा होऊ शकते. सर्वोच्च न्यायालयाने राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेण्यासाठी ३१ जानेवारी २०२६ ची मुदत दिली आहे. निवडणुकीच्या दरम्यान किंवा नंतर न्यायालयीन प्रकरणे उद्भवण्याची शक्यता लक्षात घेऊन महापालिका निवडणुका मुदतीपूर्वी १० दिवस आधी पार पाडल्या जातील, असे सूत्रांनी सांगितले.

महाराष्ट्रात अतिवृष्टी व पुरामुळे मोठे नुकसान झाले आहे. शेतकऱ्यांसह सामान्य नागरिक त्यातून आतासे सावरत आहेत. त्यातच काही भागात गेल्या आठ-पंधरा दिवसांत मोठ्या प्रमाणात पाऊस झाला आहे. या पार्श्वभूमीवर आधी जि. प. निवडणूक घ्यावी का याबाबत जिल्हाधिकाऱ्यांनी संमिश्र मते व्यक्त केली. अतिवृष्टीग्रस्त भागातील जिल्हाधिकाऱ्यांनी लगेच जिल्हा परिषद, पंचायत समित्यांची निवडणूक घेण्यासारखी स्थिती नाही असे मत नोंदविले. या पार्श्वभूमीवर नगरपालिकांची निवडणूक आधी होईल. याबाबतची घोषणा पुढील आठवड्यात होण्याची शक्यता आहे.

## संतनगरी शेगावात काळ्या व्यवसायाने गाठला कळस

### साडेसतरा लाखांची रोकड, १७ वाहने ६१ धन दांडग्या आरोपीविरुद्ध गुन्हे दाखल

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१बुलढाणा**

वरील हेडिंग वाचून कुणीही बुचकळ्यात पडणे स्वाभाविक आहे. बातमीचे शीर्षकच तसे असल्याने कुणीही गोंधळून जाण्यात गैर काहीच नाही. ही महायादी आहे पोलिसांनी एका महा अड्डयावर केलेल्या महाकारवाईची. वर्षभर अध्यात्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमानी गजबजणाऱ्या विदर्भ पंढरी शेगाव ची काळी बाजू दाखविणारी आणि संतनगरीत काळ्या व्यवसायाने किती कळस गाठला हे दर्शविणारी ही मोठी आणि सर्वांनाच थक्क करणारी ही महा कारवाई आहे.

अपर पोलीस अधिक्षक (खामगांव ) डॉ.श्रेणिक लोढा यांच्या पथकाने शेगाव येथील जुगार अड्ड्यावर मोठी कारवाई केली आहे. शेगाव येथील जुगार अड्ड्यावर मोठी कारवाई करीत नगदी १७ लाख ५२ हजार ३२० रुपयासह १२ महागड्या चारचाकी ( कार), ५ मोटार सायकल, ५२ मोबाईल सह तब्बल ६२ लाखापेक्षा जास्त रुपयाचा मुदेमाल जप्त केला आहे. काल शुक्रवारी ३१ ऑक्टोबर रोजी मध्यरात्री अपर पोलीस अधिक्षक (खामगांव) श्रेणिक लोढा यांच्या मार्गदर्शनात ही कारवाई करण्यात आली. या प्रकरणी ६१ धन दांडग्या आरोपीविरुद्ध गुन्हे दाखल करण्यात आले आहे. यामध्ये शेगाव मधील आदर्श रिसॉर्ट चे मालक विलास प्रल्हाद घाटोळ यांच्यासह जळगाव खान्देश, अकोला व बुलढाणा जिल्ह्यातील जुगार शोकीन आरोपीचा समावेश आहे. यामध्ये बहुसंख्य आरोपी जळगाव खान्देश जिल्ह्यातील आहेत.

काही आरोपी अकोला जिल्ह्यातील आहे. श्रेणिक लोढा यांना या जुगाराची टीप मिळाली होती. डॉ. श्रेणिक लोढा यांच्या सह अपर पोलीस अधिक्षक, कार्यालय खामगांव येथील सहायक पोलीस निरीक्षक सचिन पाटील, पोलीस हवालदार प्रभंजन जोशी, शिवशंकर वायाळ तसेच खामगांव शहर पोलीस ठाण्याचे येथील सहायक फौजदार बाळू डाबेराव, पोलीस हवालदार



गोपाल सातव, शेख मुजीब, नितीन पाटील, संदिप गवई, पोलीस जमादार अमरदीप ठाकूर, आशीष ठाकूर यांनी काल ३१ ऑक्टोबर रोजी रात्री ११.५० वाजता आदर्श रिसोर्टवर छापा घातला.यावेळी एकाच वेळी तब्बल ६० आरोपी जुगार खेळतांना आढळून आले.त्यांचे कडुन नगदी १७ लाख ५२ हजार ३२० रुपयासह १२ कार वाहन, ५ मोटार सायकल, ५२ मोबाईल सह एकुण ६२ लाख २ हजार रुपयाचा मुदेमाल जप्त करण्यात आला आहे. रिसॉर्ट मालकासह एकुण ६१ लोकांच्या विरुध्द जुगार कायदयान्वये पोस्टे शेगांव शहर येथे कलम ४, ५ महाराष्ट्र जुगार कायदयाप्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदरची कार्यवाही निलेश तांबे, पोलीस अधिक्षक, बुलडाणा यांचे मार्गदर्शनाखाली डॉ. श्रेणिक लोढा, अपर पोलीस अधिक्षक, खामगांव, प्रदिप पाटील. उपविभागीय पोलीस अधिकारी, खामगांव यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. या खळबळजनक कारवाईचा पुढील तपास शेगाव शहर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक नितीन पाटील यांच्या मार्गदर्शनात पोलीस उप निरीक्षक संदिप बारींगे हे करीत आहे.

## संपादकीय ......

# इतिहास रचण्याची सुवर्णसंधी....

कधी कधी आयुष्यात सर्वकाही सुरळीत सुरू असते, पण जगणे मात्र, रोजच्या पठडीतलेच असते. नवीन काही घडेल याची दूर दूरची शक्यता नसताना अचानक काहीतरी ट्विस्ट येतो आणि पुढचा प्रत्येक क्षण सेलिब्रेटिंग आणि उत्कंठावर्धक होतो. असेच काहीसे भारतीय क्रिकेट महिला संघाच्या बाबतीत घडले आहे. परवा भारताच्या महिला संघाने आयसीसी एकदिवसीय विश्वचषकाच्या उपांत्य फेरीत ऑस्ट्रेलियाच्या संघाला पराभूत करत मोठ्या दिमाखात अंतिम फेरीत प्रवेश केला. भारतीय संघाचा हा विजय जितका कौतुकास्पद तितकाच चमत्कारिकही ठरला आहे. त्यामुळेच अंतिम सामन्याचा दिवस उजाडेपर्यंत या विजयाचे सेलिब्रेशन सुरूच राहणार असल्याचे दिसते. भारत आणि श्रीलंकेत मागच्या महिनाभरापासून एकदिवसीय वर्ल्ड कप सुरू आहे. सप्टेंबरच्या ३० तारखेपासून सुरू झालेल्या या वर्ल्डकपचे काही सामने भारतात तर काही सामने श्रीलंकेत झाले. याच काळात भारतीय पुरुषांचा क्रिकेट संघ ऑस्ट्रेलियाच्या दौर्यावर जाण्याची तयारी करत होता. भारताच्या एकदिवसीय संघात रोहित शर्मा आणि विराट कोहली या दोन स्टार क्रिकेटपटूंच्या निवडीवरून बर्याच चर्चा रंगलेल्या असताना महिला विश्वचषकातील भारतीय संघाच्या प्रदर्शनाकडे क्वचितच कुणाचे लक्ष गेले असेल.

नाही म्हटले तरी वर्ल्डकपमधील भारत विरुद्ध पाकिस्तान या सामन्याची थोडीफार चर्चा झाली. कारण या चर्चेला पुरुष संघाच्या आशिया चषकातील वादाची किनार होती. परंतु, महिलांचा भारत विरुद्ध पाकिस्तान हा सामना अगदीच एकतर्फी झाला. भारतीय संघाने साखळी सामन्यात पाकिस्तानी संघाला सहजरित्या पराभूत केले. या विजयानंतर महिला संघाचे कौतुक झाले, पण तेवढ्यापुरतेच. कारण, पलीकडे ऑस्ट्रेलियात रोहित, विराटची बॅट तळपत असल्याने सगळ्यांच्या नजरा दोघांवर खिळल्या होत्या. भारतात क्रिकेटहून अधिक लोकप्रिय खेळ दुसरा कुठलाही नाही. भलेही हॉकी हा आपला राष्ट्रीय खेळ असला, तरी क्रिकेटच्या लोकप्रियतेच्या तुलनेत तो फिकाच ठरतो. कधी कॉमनवेल्थ तर कधी ऑलिम्पिकमध्ये कुठल्या खेळाडूने पदक मिळवले की तेवढ्यापुरते त्या खेळाडूला उचलून धरले जाते. इथे खेळापेक्षा खेळाडूचीच क्रेझ अधिक असते. त्याला जिकडे तिकडे सेलिब्रिटीचा दर्जा मिळू लागतो. काही कालावधीनंतर हा जोर ओसरतो. क्रिकेटच्या बाबतीत तसे नाही. भारतीय पुरुषांचा संघ वर्षभर क्रिकेट खेळत असतो. आंतरराष्ट्रीय क्रिकेट नसेल तर आयपीएल सुरू असते, त्यामुळे हे क्रिकेटस्टार्स सतत प्रसिद्धीच्या झोतात असतात. कुणाला वाटेल की महिलांच्या संघाला पुरुषांच्या तुलनेत कमी महत्त्व दिले जात आहे किंवा जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले जात आहे, तर तसे नाही. इथे परफॉर्मन्स हा खूपच कळीचा मुद्दा ठरतो. नाही म्हटले तरी, मागच्या काही वर्षांत भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने महिला क्रिकेटचे बरेच व्यावसायिकरण केले आहे. लाईव्ह मॅचचे प्रक्षेपण, प्रसिद्धीच्या माध्यमातून प्रायोजकांसह मंडळाने प्रेक्षकही जोडले आहेत. महिला क्रिकेटपटूंना पुरुषांच्या बरोबरीने वेतन, सोईसुविधा मिळू लागले आहे. मिताली राज, झुलन गोस्वामीनंतर हरमनप्रित कौर, स्मृती मंधाना, शेफाली वर्मा, दिप्ती शर्मा, जेमिमा रॉड्रिग्ज अशा अनेक स्टार्स मागच्या काही वर्षांत उदयाला आल्या आहेत. भारतीय संघाचा सामना सुरू असताना या खेळाडूंच्या प्रदर्शनाला प्रेक्षकांचा आता चांगला प्रतिसादही मिळतो. केवळ कामगिरीतील सातत्य हा महिला क्रिकेट संघासाठी चिंतेचा विषय आहे. ज्येष्ठ रणजीपटू व प्रशिक्षक अमोल मुझूमदार यांच्या मार्गदर्शनाखाली खेळणार्या महिला क्रिकेट संघाची अवस्था आजही लगी तो छगी अशी आहे. सध्या सुरू असलेल्या वर्ल्ड कपच्या बाबतीतच सांगायचे झाल्यास ७ साखळी सामन्यांपैकी ३ मध्ये विजय, ३ पराजय आणि १ सामना अनिर्णीत अशी फिक्टी फिक्टी कामगिरी भारतीय संघाची होती. साखळीतील शेवटचा बांगलादेशसोबतचा सामना पावसाने धुतला. त्याआधीचा न्यूझीलंडसोबत झालेला सामना जिंकल्यामुळे क्रमवारीत चौथ्या स्थानावर असलेल्या भारताला उपांत्य फेरीत उडी मारता आली. उपांत्य फेरीतला ऑस्ट्रेलियासोबतचा सामना जराही सोपा नव्हता.

# भारतातील एमएसएमईंच्या खर्च आणि स्पर्धात्मकता क्षमता बांधणी कार्यशाळा संपन्न

## एमएसएमई उद्योगांच्या सर्वांगिण विकासासाठी सर्वंकष प्रयत्न करणार –विभागीय आयुक्त डॉ. सिंघल

**विदर्भ प्रजासत्ताकदि.१अमरावती**

सुक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग (एमएसएमई) क्षेत्र हे भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा असून भारताच्या सकल देशांतर्गत उत्पादनाच्या (जीडीपीच्या) ३० टक्के आणि जागतिक निर्यातीमध्ये ४५ टक्के योगदान देते. तसेच शेती क्षेत्रानंतर दुसऱ्या क्रमांकाचे सर्वाधिक रोजगार निर्माण करणारे क्षेत्र आहे. विकसित भारत-२०४७ च्या दृष्टीने विकसित अर्थव्यवस्था या आकांशा पूर्ततेसाठी एमएसएमई क्षेत्राला अधिक बळकट व लवचिक बनवणे आवश्यक आहे. विभागातील एमएसएमई अंतर्गत येणाऱ्या उद्योगांच्या सर्वांगिण विकासाच्या दृष्टीने ज्या-ज्या आवश्यक बाबींची पूर्तता करावयाची आहे, त्यासाठी राज्य शासनाकडे पाठपुरावा केल्या जाईल, असे विभागीय आयुक्त डॉ. श्वेता सिंघल यांनी आज येथे सांगितले.केंद्र सरकारच्या सुक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग मंत्रालय अंतर्गत असलेल्या नागपूर एमएसएमई विकास कार्यालय, अमरावती एमआयडीसी असोसिएशन, औद्योगिक वसाहत सहकारी संस्था व नांदगाव पेठ एमआयडीसी असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने 'एमएसएमई उद्योजकांच्या खर्च आणि स्पर्धात्मकतेबाबत क्षमता बांधणी' या विषयावर एक दिवसीय राष्ट्रीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी त्या मुख्य अतिथी म्हणून बोलत होत्या. एमएसएमई विकास कार्यालयाचे सह संचालक विजय शिरसाठ, सह संचालक (उद्योग) निलेश




निकम, एसएसएमई सहाय्यक संचालक मनीष झा, लिड बँक मॅनेजर नरेश हेडाऊ, एमआयडीसी असोसिएशनचे अध्यक्ष किरण पातुरकर, अमरावती चेंबर ऑफ कॉमर्स विनोद कलंत्री यांच्यासह उद्योग क्षेत्रातील विषयतज्ज्ञ यावेळी कार्यशाळेला उपस्थित होते.

विभागीय आयुक्त डॉ. सिंघल म्हणाल्या की, एमएसएमईजची प्रचंड आर्थिक क्षमता असूनही, या उद्योगांना त्यांच्या खर्च आणि स्पर्धात्मकतेच्या संदर्भात अनेक आव्हानांचा सामना करावा लागतो. एमएसएमई क्षेत्रात सक्षम वातावरण निर्माण करणे, तसेच अगदी तळाच्या आव्हानांचा सामना करण्यासाठी भारतीय एमएसएमईजची किंमत आणि स्पर्धात्मकता वाढविणे आवश्यक आहे. यासाठी केंद्र सरकारव्दारे एक व्यापक उपक्रम हाती घेण्याची योजना आखण्यात आली आहे. यामुळे एमएसएमईजना बाह्य चढउतारांशी जुळवून घेणे आणि त्यांना जागतिक मानकांच्या बरोबरीने आणण्याचा प्रयत्न केल्या जाईल. उद्योग क्षेत्राच्या सर्वांगिण विकासासाठी तसेच अर्थव्यवस्थेच्या बळकटीकरणासाठी अशा पध्दतीच्या कार्यक्रमांचे आयोजन होत आहे, हा एक स्तुत्य उपक्रम आहे. आगामी काळात अमरावती येथे विभागस्तरीय औद्योगिक विकास परिषदेचे आयोजन करण्याचा मानस असल्याचे विभागीय आयुक्तांनी सांगितले. तसेच उद्योग-व्यवसायांकरिता लागणाऱ्या कुशल मणुष्यबळासाठी अमरावती विद्यापीठात कौशल्य विकासाधारित पदवी, पदविका अभ्यासक्रम सुरु करण्यासाठी पाऊले उचलली जातील, असेही त्यांनी सांगितले.एसएसएमई नागपूरचे सह संचालक श्री. सिरसाठ म्हणाले, सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग (चडचए) मंत्रालयाने 'विकसित भारत २०४७ च्या दृष्टिकोनातून एमएसएमई क्षेत्राला अधिक लवचिक आणि जागतिक मानकांनुसार सक्षम बनवण्यासाठी एक महत्त्वाकांक्षी तीन-स्तरीय राष्ट्रीय सल्लामसलत कार्यक्रम सुरू केला आहे. भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा असलेल्या या क्षेत्रातील उद्योजकांना भेडसावणाऱ्या खर्च आणि स्पर्धात्मकतेच्या आव्हानांवर थेट तळागाळातील उपाययोजना मिळवणे, हे या उपक्रमाचे मुख्य उद्दिष्ट आहे.

कार्यक्रमाची सुरुवात क्लस्टर-स्तरीय कार्यशाळांनी झाली आहे. देशभरातील विविध क्लस्टर (उद्योग समूह) आणि भागधारकांशी सल्लामसलत करून या कार्यशाळा आयोजित केल्या जात आहेत. खर्च व्यवस्थापन आणि स्पर्धात्मकतेशी संबंधित समस्यांवर एमएसएमईकडून थेट अभिप्राय (ऋशशवलरलज्ञ) घेणे हा या कार्यशाळांच्या आयोजनामागील उद्देश असून एमएसएमईंना बाह्य चढउतारांशी जुळवून घेण्यासाठी सक्षम करणे आणि त्यांना जागतिक मानकांच्या (ऋश्चेलरश्र डींरपवरीवी) बरोबरीने आणणे हे लक्ष्य ठेवण्यात आले आहे. या माध्यमातून धोरणे, कार्यक्रम, योजना आणि नियामक समर्थनासाठी उपयुक्त ठरतील अशा कृतीयोग्य शिफारसी गोळा करणे शक्य होईल, अशी माहिती श्री. सिरसाठ यांनी कार्यशाळेत तळागाळापासून ते राष्ट्रीय स्तरापर्यंत तीन-स्तरीय आराखड्याच्या माध्यमातून उद्योग धोरण तयार करण्यास मदत मिळेल. याअंतर्गत पहिल्या स्तरावर क्लस्टर कार्यशाळांच्या आयोजनातून स्थानिक स्तरावरील आव्हाने आणि शिफारसी तयार करणे, व्दितीय स्तरावर विभागीय परिषदांच्या माध्यमातून क्लस्टर स्तरावरून मिळालेले निष्कर्ष एकत्रित करून त्यांना उत्पादन/क्षेत्र-विशिष्ट ट्रेंड आणि प्राधान्यांमध्ये रूपांतरित करणे, तर तिसऱ्या स्तरावर राष्ट्रीय शिखर परिषदांच्या माध्यमातून विभागीय स्तरावरील शिफारसींचा अंतिम समावेश करून त्यांना धोरणात्मक निर्णय आणि नियामक समर्थनात परावर्तित करणे आदी महत्वपूर्ण बाबी पूर्ण केल्या जाईल.

# या ठिकाणी घेता येईल गुलाबी थंडीचा आनंद

**दि.१विदर्भ प्रजासत्ताक**

हिवाळ्यात थंडगार वातावरणात फिरायला जायची मज्जा काही वेगळीच असते. ऑक्टोबरच्या हिटनंतर सर्वचजण गुलाबी थंडीची वाट पाहतात. कारण थंडीत शेकोटीजवळ बसून गरमा गरम कॉफी, चहा आणि सोबत आपली माणसे म्हणजे सुख. त्यामुळे अनेकजण नोव्हेंबर-डिसेंबरमध्ये



कुटूंबासोबत, मित्र-मैत्रिणींसह फिरण्याचा प्लॅन आखतात. आज आपण जाणून घेऊयात गुलाबी थंडीचा आनंद द्विगुणित करणारी बजेटमध्ये बसणारी ठिकाणे,

**मनाली** –मनाली निसर्गरम्य वातावरण आणि गुलाबी थंडीसाठी प्रसिद्ध आहे. बरेचसे पर्यटक येथे दिवाळीनंतर अर्थात नोव्हेंबर-डिसेंबरमध्ये येथे जातात. येथे तुम्हाला स्कीइंग, स्नोबार्डिंगसाठी आनंद घेता येईल.

**औली** –उत्तराखंडचे काश्मीर अशी औलीची ओळख आहे. जानेवारीमध्ये येथे बर्फवृष्टी होते. तुम्ही जानेवारीच्या आसपास गुलाबी थंडीची मज्जा घेण्याचा विचार करत असाल तर हे ठिकाण उत्तम आहे.

**राजस्थान** – हिवाळ्यात फिरण्यासाठी राजस्थान उत्तम ठिकाण आहे. इतिहास, संस्कृती आणि निसर्गसौंदर्याचा अनोखा संगम येथे अनुभवायला मिळेल. ५ ते ६ दिवस राजस्थान फिरण्यासाठी पुरेसे आहेत.

**वर्कला** –दक्षिण भारतातील वर्कला येथे हिवाळ्यात भेट देण्याचा नक्की विचार करावा. केरळच्या तिरुवअनंतपुरम जिल्ह्यात स्थित हे ठिकाण आहे. येथे तुम्ही वॉटर स्पोर्ट्सचा आनंद घेऊ शकता.

**गुलमर्ग** –हिमवर्षाव पाहायची इच्छा असेल तर गुलमर्ग ठिकाण उत्तम असेल. येथे तुम्ही स्कीइंग, स्नोबोर्डिंग आणि गोंडोला राईड करता येईल.

**कुफरी** – शिमला येथून जवळच असणारं कुफरी थंडीची मज्जा घेण्यासाठी उत्तम पर्याय आहे. नोव्हेंबरच्या सुरूवातीला येथे बर्फवृष्टी पाहायला मिळते.

**महाबळेश्वर** – महाबळेश्वर बजेटमध्ये बसणारे ठिकाण आहे. हिरवगार वातावरण, दऱ्या यासाठी हे ठिकाण प्रसिद्ध आहे.

# रब्बी हंगामातील 'या' सहा पिकांसाठी विमा अर्ज करण्याची प्रक्रिया सुरु; जाणून घ्या सविस्तर

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१अमरावती** पिकांच्या नुकसानीच्या अत्यंत कठीण परिस्थितीतही शेतकऱ्यांचे आर्थिक स्थैर्य अबाधित राखणेसाठी महाराष्ट्र शासनाने राज्यात खरीप २०२५ व रब्बी हंगाम २०२५-२६ करीता पीक विमा योजना राबविली जाते.

अधिसूचित क्षेत्रातील अधिसूचित पिकांसाठी विमा क्षेत्र घटक धरुन उत्पादनावर आधारीत सुधारित प्रधानमंत्री पीक विमा योजना राबविण्याचा निर्णय शासनाने घेतलेला आहे.

रब्बी हंगाम २०२५-२६ गहू (बागायत), रब्बी ज्वारी (बागायत व जिरायल), हरभरा, उन्हाळी भात, उन्हाळी भुईमुग व रब्बी कांदा (६ पिके) या अधिसूचित पिकांसाठी, अधिसूचित महसूल मंडळ/क्षेत्रात शेतकऱ्यांना सहभाग घेता येईल.

सदर योजनेतील सहभाग हा कर्जदार तसेच बिगर कर्जदार शेतकऱ्यांना ऐच्छिक असून योजनेत सहभाग घेण्याची अंतिम मुदत पुढीलप्रमाणे आहे.

रब्बी ज्वारी (बागायत व जिरायत) करिता दिनांक ३० नोव्हेंबर, २०२५.

गहु (बागायत), हरभरा, रब्बी कांदा या पिकाकरिता दिनांक १५ डिसेंबर, २०२५.

उन्हाळी भात, उन्हाळी भुईमूग या पिकाकरिता दिनांक ३१ मार्च, २०२६ अशी आहे.

त्यासाठीचे झचऋझ्ध पोर्टल कार्यान्वित करण्यात आले आहे. कर्जदार शेतकऱ्यांना योजनेत सहभागी होण्यासाठी कर्ज मंजूर करणाऱ्या बँकमार्फत योजनेत सहभागी होण्यासाठी विहित नमुन्यात अर्ज भरुन देणे आवश्यक आहे.

जर कर्जदार शेतकऱ्यांना योजनेत सहभागी व्हायचे नसेल तर तसे त्यांनी नोंदणीच्या अंतिम मुदतीच्या सात दिवस आधी कर्ज मंजूर करणाऱ्या बँकेस लेखी कळविणे आवश्यक आहे.

जे शेतकरी स्वत:च्या स्वाक्षरीसह योजनेत सहभागी न होणेबाबत घोषणापत्र देणार नाहीत त्या सर्व शेतकऱ्यांचा योजनेमध्ये सहभाग बंधनकारक समजला जाईल.

यासाठी सर्व शेतकऱ्यांना आवाहन करण्यात येते की, रब्बी हंगाम २०२५-२६ मध्ये प्रधानमंत्री पिक विमा योजनेच्या पोर्टलवर स्वत:ही शेतकरी नोंदणी करू शकतात.

अथवा बँक, विमा कंपनीने नियुक्त केलेले एजंट, क्रॉप इंन्शुरन्स ॲप व सामुहिक सेवा केंद्र (उडउ) यांचे मार्फत योजनेतील सहभागाची नोंदणी करावी.

अधिक माहितीसाठी तात्काळ आपल्या संबंधित पीक विमा कंपनीचे कार्यालय, तहसिलदार/तालुका कृषि अधिकारी, जिल्हाधिकारी/जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांचे कार्यालयाशी यांचेशी संपर्क साधावा.

योजना कार्यान्वयीन यंत्रणा

अ. क्र. समूह क्र. समाविष्ट जिल्हे नियुक्त विमा कंपनी संपर्क तपशील

१ १ अहिल्यानगर, नाशिक, चंद्रपूर भारतीय कृषि विमा कंपनी मुंबई क्षेत्रिय कार्यालय, लोक चेंबर्स, मरोळ मरोशी रोड, मरोळ, अंधेरी (पूर्व), मुंबई-४०००५९ ईमेल: pikvimaaicofindia.com

२ २ सोलापूर, जळगाव, सातारा भारतीय कृषि विमा कंपनी मुंबई क्षेत्रिय कार्यालय, लोक चेंबर्स, मरोळ मरोशी रोड, मरोळ, अंधेरी (पूर्व), मुंबई-४०००५९ ईमेल: pikvimaaicofindia.com




३ ३ परभणी, वर्धा, नागपूर भारतीय कृषि विमा कंपनी मुंबई क्षेत्रिय कार्यालय, लोक चेंबर्स, मरोळ मरोशी रोड, मरोळ, अंधेरी (पूर्व), मुंबई-४०००५९ ईमेल: pikvimaaicofindia.com

४ ४ जालना, गोंदिया, कोल्हापूर भारतीय कृषि विमा कंपनी मुंबई क्षेत्रिय कार्यालय, लोक चेंबर्स, मरोळ मरोशी रोड, मरोळ, अंधेरी (पूर्व), मुंबई-४०००५९ ईमेल: pikvimaaicofindia.com

५ ५ नांदेड, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग भारतीय कृषि विमा कंपनीमुंबई क्षेत्रिय कार्यालय, लोक चेंबर्स, मरोळ मरोशी रोड, मरोळ, अंधेरी (पूर्व), मुंबई-४०००५९ ईमेल: pikvimaaicofindia.com

६, छत्रपती संभाजीनगर, भंडारा, पालघर, रायगड भारतीय कृषि विमा कंपनी मुंबई क्षेत्रिय कार्यालय, लोक चेंबर्स, मरोळ मरोशी रोड, मरोळ, अंधेरी (पूर्व), मुंबई-४०००५९ ईमेल: pikvimaaicofindia.com

७ ७ वाशिम, बुलडाणा, सांगली, नंदुरबार भारतीय कृषि विमा कंपनी मुंबई क्षेत्रिय कार्यालय, लोक चेंबर्स, मरोळ मरोशी रोड, मरोळ, अंधेरी (पूर्व), मुंबई-४०००५९ ईमेल: pikvimaaicofindia.com

८ ८ हिंगोली, अकोला, धुळे, पुणे भारतीय कृषि विमा कंपनी मुंबई क्षेत्रिय कार्यालय, लोक चेंबर्स, मरोळ मरोशी रोड, मरोळ, अंधेरी (पूर्व), मुंबई-४०००५९ ईमेल: pikvimaaicofindia.com

९ यवतमाळ, अमरावती, गडचिरोली भारतीय कृषि विमा कंपनी मुंबई क्षेत्रिय कार्यालय, लोक चेंबर्स, मरोळ मरोशी रोड, मरोळ, अंधेरी (पूर्व), मुंबई-४०००५९ ईमेल: pikvimaaicofindia.com

१० धाराशिव आयसीआयसीआय लोंबार्ड जनरल इंन्शुरन्स कंपनी लिमिटेड माणिकचंद आयकॉन, ३ रा मजला, प्लॉट नं. २४६, सी विंग, बंडगार्डन, पुणे-४११००१ ईमेल: ICICILOMPMFBYM Hicicilombard.com

११ ११ लातूर आयसीआयसीआय लोंबार्ड जनरल इंन्शुरन्स कंपनी लिमिटेड माणिकचंद आयकॉन, ३ रा मजला, प्लॉट नं. २४६, सी विंग, बंडगार्डन, पुणे-४११००१ ईमेल: ICICILOMPMFBYM Hicicilombard.com

१२ १२ बीड आयसीआयसीआय लोंबार्ड जनरल इंन्शुरन्स कंपनी लिमिटेड माणिकचंद आयकॉन, ३ रा मजला, प्लॉट नं. २४६, सी विंग, बंडगार्डन, पुणे-४११००१ ईमेल: ICICILOMPMFBY MHicicilombard.com


तरी रब्बी हंगाम २०२५-२६ मध्ये जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी या योजनेत सहभागी व्हावे असे आवाहन करण्यात येत आहे.

# सर्वोच्च न्यायालयाचा महत्वपूर्ण निकाल ! अनुसूचित क्षेत्रातील २३ हजार पदांच्या भरतीचा मार्ग मोकळा

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१अमरावती–** सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयानंतर, राज्यातील अनुसूचित (पेसा) क्षेत्रातील मानधन तत्त्वावर कार्यरत आदिवासी कर्मचाऱ्यांच्या कायमस्वरूपी पदभरतीचा मार्ग अखेर मोकळा झाला आहे. या भरतीसंदर्भात २८ ऑक्टोबर रोजी मंत्रालयात मुख्य सचिवांच्या दालनात झालेल्या महत्त्वपूर्ण बैठकीत गत १५ वर्षापासून रखडलेल्या पदभरतीला मंजुरी देण्यात आली. त्यामुळे आता राज्यातील अनुसूचित क्षेत्रांमध्ये सुमारे २३ हजार पदांची भरती होणार आहे. या बैठकीला आदिवासी विकास मंत्री डॉ. अशोक उईके, अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ, मुख्य सचिव राजेश कुमार मीना, आदिवासी मतदारसंघातील आमदार, सामान्य प्रशासन विभाग, विधि व न्याय विभाग, आदिवासी विकास विभागाचे सचिव उपस्थित होते. गेल्या १५ वर्षापासून राज्यात अनुसूचित क्षेत्रातील पदभरती रखडली असल्याबाबत 'लोकमत'ने वेळोवेळी वृत्त प्रकाशित केले.

**कायमस्वरूपी पद भरती–** आमच्या न्यूजलेटरसाठी साईन-अप करा Email -ddress- पेसा भरती प्रक्रियेतील तीन हजार ६९३ उमेदवारांचा निकाल तयार असताना घोषित केलेला नाही. २ हजार ४८८ उमेदवारांचा




निकाल घोषित असून, त्यांना नियुक्त्या दिलेल्या नाहीत. अशा एकूण ६ हजार १८१ नियुक्त्या रखडलेल्या आहेत. पेसा क्षेत्रातील अनुसूचित जमातीच्या शिक्षकांची १७हजार ३३ पदे रिक्त आहेत. आता ही पदे कायमस्वरूपी भरण्यात येणार आहेत.

१) संविधानातील पाचवी अनुसूची संविधानाच्या आतील संविधान आहे. राष्ट्रपती यांनी घोषित केलेल्या अनुसूचित क्षेत्राच्या अनुषंगाने राज्यपाल यांनी सहा अधिसूचना काढून पदभरतीचे निर्देश होते.

२९ ऑगस्ट २०१९ च्या अधिसूचनेला आणि १ फेब्रुवारी व २८ फेब्रुवारी २०२३ च्या शासन निर्णयाला बिगर आदिवासींनी कोर्टात आव्हान दिले होते. सर्वोच्च न्यायालयाने निर्णय देऊन पेसा भरतीचा अडथळा दूर केला आहे. बऱ्याच वर्षांपासून आदिवासी उमेदवार आपल्या घटनात्मक हक्कापासून वंचित आहे. आतातरी कायमस्वरूपी पदभरती होऊन बेरोजगार आदिवासी उमेदवारांना घटनात्मक न्याय मिळावा.

**– ॲड. प्रमोद घोडाम,** राष्ट्रीय संस्थापक अध्यक्ष ट्रायबल फोरम.

आपल्या परिसरातील बातम्या, लेख, यशोगाथा, जाहिरात तुम्ही आमच्या मेल वर पाठवू शकता prajasattaknews.24gmail.com, arunjoshi.ucn@gmail.com या मेल वर पाठवा आमचा अंक तुम्हाला अगदी मोफत मिळवायचा असेल तर आम्हाला मेल करा तुमचा व्हाट्सअप नंबर

सांध्य दैनिक विदर्भ प्रजासत्ताक RNI NO-M-HM-R 2023/84526-प्रिंट / **PDF** / वेब - पोर्टल /ई - पेपर

https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on

क्यु आर कोड स्कॅन करा ग्रुप ला जॉइन व्हा

विदर्भ प्रजासत्ताक

शनिवार दि. १ नोव्हेंबर २०२५ शहर/ग्रामिण

# १५ नोव्हेंबरपासून नाफेडची मूग, उडीद, सोयाबीन खरेदी सुरू

## शेतकऱ्यांनी नोंदणी करण्याचे आवाहन, जिल्ह्यातील १५ नोंदणी केंद्रांना मान्यता

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१अमरावती**

केंद्र शासनाच्या किमान आधारभूत किंमत खरेदी योजनेंतर्गत मूग, उडीद आणि सोयाबीन पिकांची खरेदी १५ नोव्हेंबरपासून सुरू होणार आहे. यासाठी शेतकऱ्यांना ऑनलाईन नोंदणी करावी लागणार आहे. ही नोंदणी दि. ३० ऑक्टोबरपासून सुरू झाली आहे.शेतकऱ्यांच्या ऑनलाईन नोंदणीची अंतिम मुदत ही दि. ३१ डिसेंबर आहे. त्यानंतर १५ नोव्हेंबरपासून प्रत्यक्ष खरेदी प्रक्रिया सुरू होणार आहे. खरेदीचा कालावधी हा दि. १५ नोव्हेंबरपासून पुढील ९० दिवसांसाठी राहणार आहे. जिल्ह्यात १५ खरेदी केंद्रांना मान्यता देण्यात आली आहे. जिल्ह्यात पणन महासंघाचे ८ आणि विदर्भ को-ऑपरेटिव्हच्या ७ उपअभिकर्ता संस्थांच्या खरेदी केंद्रांना शेतकरी नोंदणीसाठी मान्यता मिळाली आहे. पणन महासंघाच्या उपअभिकर्ता संस्थांमध्ये अचलपूर तालुका सहकारी शेतकी खरेदी विक्री संघ मर्यादित, अचलपूर, जयसिंग विविध कार्यकारी सहकारी संस्था मर्यादित, पथ्रोट, दर्यापूर तालुका सहकारी खरेदी विक्री संघ, दर्यापुर, धारणी तालुका सहकारी शेतकी खरेदी विक्री संस्था मर्यादित, धारणी, नेरपिंगळाई विविध कार्यकारी सहकारी संस्था मर्यादित, नेरपिंगळाई, चांदुर रेल्वे विकास खंड सहकारी शेतकरी खरेदी विक्री समिती मर्यादित चांदुर रेल्वे, नांदगाव खंडेश्वर तालुका सहकारी शेतकरी खरेदी विक्री

समिती मर्यादित, नांदगाव खंडेश्वर, डॉ. बी. पी. देशमुख तिवसा तालुका सहकारी शेतकी खरेदी विक्री समिती मर्यादित तिवसा यांचा समावेश आहे. विदर्भ को-ऑपरेटिव्ह उपअभिकर्ता संस्थांमध्ये विदर्भ को-ऑपरेटिव्ह मार्केटिंग फेडरेशन अमरावती, अंजनगाव सुर्जी तालुका सहकारी खरेदी विक्री संघ, अंजनगाव सुर्जी, चांदूर बाजार सहकारी तालुका सहकारी खरेदी विक्री संघ, चांदुर बाजार, शिंगणापूर विविध कार्यकारी सहकारी संस्था मर्यादित, दर्यापूरला शिंगणापूर, दत्तापूर (धामणगाव) ग्रीकल्चर खरेदी विक्री संघ, धामणगाव रेल्वे, मोर्शी तालुका सहकारी शेतकरी खरेदी विक्री संघ, मोर्शी, वरुड तालुका सहकारी शेतकरी खरेदी विक्री संघ, वरुड यांचा समावेश आहे. शेतकऱ्यांनी नजीकच्या खरेदी केंद्रावर नोंदणी करण्यासाठी कागदपत्रांसह अर्ज करावा. नोंदणीसाठी स्वतः:चे आधारकार्ड, मोबाईल क्रमांक, चालू हंगामातील पीक पेरा नमुद केलेला सातबारा, नमुना आठ-अ, सामाईक सातबारा क्षेत्र असल्यास सर्वांचे आधारकार्डसह संमती पत्र, अद्यावत बँक पासबुकची झेरॉक्स कागदपत्रे आवश्यक आहे.हमीभाव खरेदी केंद्रावर सोयाबीन विक्रीकरीता शेतकऱ्यांनी चांगल्या दर्जाचे सोयाबीन असल्याची खात्री करावी. शासनाने ठरवलेल्या गुणवत्तेच्या मानकांमध्ये बसणारे सोयाबीन विक्रीसाठी आणावे. जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी नाफेडच्या धान्य खरेदी योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हाधिकारी आशिष येरेकर आणि जिल्हा पणन अधिकारी अजय बिसने यांनी केले आहे.

# जिल्ह्याची सुधारित पैसेवारी ४९ वर

## दुष्काळी उपाययोजनांसाठी लगबग

### जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांची घोषणा, यापूर्वीची नजरअंदाज पैसेवारी ६०



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१अमरावती-** शेती पिकांची वास्तविकता स्पष्ट करणारी सुधारित पैसेवारी शुक्रवारी घोषित करण्यात आली. ही पैसेवारी ४९ वर स्थिरावली आहे जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी सायंकाळी ही घोषणा केली. त्यानुसार दुष्काळी उपाययोजनांसाठी प्रशासनात लगबग सुरू झाली आहे. यापूर्वीची नजर अंदाज पैसेवारी ही ५० हून अधिक (६०) होती.

राज्य शासनाने एक दिवसापूर्वीच शेतीपिकाचे नुकसान झाले, हे मान्य केले असून जिल्हाभरातील जवळपास सर्व शेतकऱ्यांना सततच्या पावसामुळे नुकसान झाल्यावर द्यावयाचे अनुदान घोषित केले आहे. त्यानंतर आज सुधारित पैसेवारी ५० च्या आत आल्याने दुष्काळी उपाययोजनाही लागू होण्याचा मार्ग आता मोकळा झाला आहे.

या घोषणेनुसार सर्वाधिक ५३ ही पैसेवारी अमरावती तालुक्याची असून मोर्शी व वरुड तालुक्याची अनुक्रमे ५२ व ५१ आहे. तर सर्वात कमी ४३ एवढी पैसेवारी ही तिवसा तालुक्याची आहे. पैसेवारीचे आकडे ५० च्या आत असल्यास महसूल व कृषी खात्याला दुष्काळी योजना लागू कराव्या लागतात. त्यासाठी प्रशासकीय पातळीवर नियोजन केले जात आहे. पैसेवारीची आकडेमोड करण्यासाठी महसूल प्रशासनाने जिल्ह्यातील एकूण १९७३ गावांमध्ये शेती पिकाची पाहणी केली. जिल्ह्यात एकूण २००४ गावे असून यापैकी ३१ गावे उजाड असल्याचा महसूल खात्याचा अहवाल आहे. पाहणी केलेल्या १९७३ गावांपैकी १६४२ गावांमध्ये ५० पेक्षा कमी पैसेवारीची नोंद करण्यात आली आहे. तर ३३१ गावांची पैसेवारी ही ५० पेक्षा जास्त असल्याचे जिल्हाधिकाऱ्यांच्या अहवालात म्हटले आहे. तालुका पैसेवारी अमरावती ५३ भातकुली ४८ तिवसा ४३ चांदूर रेल्वे ४७ धामणगाव रेल्वे ४९ नांदगाव खंडेश्वर ४९ मोर्शी ५२ वरुड ५१ अचलपूर ४६ चांदूर बाजार ४७ दर्यापूर ४८ अंजनगाव सुर्जी ४८ धारणी ४९ चिखलदरा ४८ एकूण ४९ या असतील उपाययोजना पैसेवारी ५० च्या आत असल्यामुळे काही उपाययोजना लागू करण्यात येणार आहेत. यामध्ये कर्ज आणि वीज बिल वसुलीला स्थगिती, विद्यार्थ्यांच्या परीक्षा शुल्काला माफीचा समावेश आहे. याशिवाय नुकसानाच्या अनुदानातून कोणत्याही प्रकारची कर्ज कपात न करता ती रक्कम शेतकऱ्यांना त्यांच्या मर्जीनुसार वापरण्याची मुभा द्यावी लागते.

पैसेवारीत तिवसा सर्वात कमी, अमरावती तालुका सर्वाधिक तालुकानिहाय पैसेवारीच्या आकड्यांमध्ये तिवसा तालुक्याची पैसेवारी ही सर्वात कमी ४३ वर थांबली आहे. याउलट जिल्ह्याचे मुख्यालय असलेल्या अमरावती तालुक्याची पैसेवारी ही ५३ नोंदण्यात आली आहे. दरम्यान ५० च्या वर पैसेवारी असलेल्या आणखी दोन तालुक्यांमध्ये मोर्शी (५२) व वरुड (५१) चा समावेश आहे.

# आता आमदार रवी राणा यांनाही जीवे मारण्याची धमकी

## प्रहारचे प्रशांत डिक्कर यांनी केली 'शीर उडविण्याची' हिंसक भाषा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१अमरावती -** दोन दिवसांपूर्वीच भाजप नेत्या व माजी खासदार नवनीत राणा यांना जीवे मारण्याची धमकी देणारे पत्र त्यांच्या निवासस्थानी स्पीड पोस्टने पोहोचले होते. आता त्यांचे पती व बडनेरा मतदारसंघाचे आमदार रवी राणा यांनाही जीवे मारण्याची धमकी देण्यात आली आहे.

ही धमकी प्रहार पक्षाचे कार्यकर्ते प्रशांत डिक्कर यांनी सोशल मीडिया व सार्वजनिक वक्तव्यांद्वारे दिली आहे.



त्यांच्या वक्तव्यांत आमदार रवी राणा यांना उद्देशून मैदानात उतर, मी तुझे शीर कोयत्याने उडवण्याची ताकद ठेवतो, अशी हिंसक व आक्षेपार्ह भाषा करण्यात आली आहे. डिक्कर यांच्या या विधानावर युवा स्वाभिमान पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी कडक पलटवार केला आहे. पक्षाचे प्रवक्ते विनोद गुहे यांनी म्हटले की, प्रशांत डिक्कर हे मीडिया व सोशल मीडियावर चमकण्यासाठी हिंसेची भाषा करत आहेत. ही भाषा लोकशाहीची नसून अराजकतेची आहे, जी समाजासाठी धोकादायक आहे. अशी भडकाऊ विधाने सहन केली जाणार नाहीत; उलट, डिक्कर यांच्यावर कारवाई केली जाईल. विनोद गुहे यांनी डिक्कर यांना उघड आव्हान देत सांगितले की, जर त्यांच्यात खरी हिंमत असेल तर आमदार रवी राणा यांना स्पर्श करून दाखवा; तेव्हा युवा स्वाभिमानींची ताकद कळेल. दरम्यान, राजापेठ पोलिसांनी प्रशांत डिक्कर यांच्या धमकीच्या विधानाची गंभीर दखल घेत तपास सुरू केला आहे.

# झेडपीकडून ३४ कोटी ५३ लाखांच्या १४४ कामांना प्रशासकीय मान्यत

## प्रत्यक्ष प्रारंभ निविदा प्रक्रियेनंतरच

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१अमरावती-** आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांची शक्यता लक्षात घेऊन जिल्हा परिषदेच्या बांधकाम विभागाने विकासकामांना गती दिली आहे. आचारसंहितेपूर्वीच कामे मार्गी लावण्यासाठी तब्बल ३४ कोटी ५३ लाख रुपये खर्चाच्या १४४ विकासकामांना प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. मात्र, प्रत्यक्ष कामांना सुरुवात निविदा प्रक्रिया पूर्ण होऊन कार्यारंभ आदेश मिळाल्यानंतरच होणार आहे.

नोव्हेंबर ते जानेवारी या कालावधीत जिल्ह्यात जिल्हा परिषद, पंचायत समित्या, नगरपालिका, नगरपंचायती व महापालिकांच्या निवडणुका होण्याची




शक्यता आहे. त्यामुळे जवळपास अडीच ते तीन महिने विकासकामे ठप्प राहण्याचा अंदाज आहे. याचा परिणाम म्हणून फेब्रुवारी-मार्च या दोनच महिन्यांत निधी खर्चासाठी वेळ उपलब्ध राहणार आहे, त्यामुळे निधी अखर्चित राहण्याची शक्यताही नाकारता येत नाही.

जिल्हा परिषदेच्या बांधकाम विभागाने ग्रामिण मार्ग, इतर जिल्हा मार्ग व तीर्थक्षेत्र या शिर्षांतर्गत एकूण ४४ कोटी २२ लाख रुपयांचे नियोजन केले आहे. यामधून -

ग्रामिण रस्ते: २१ कोटी १९ लाख रुपये (६४ कामे)

इतर जिल्हा मार्ग: ५ कोटी ३५ लाख रुपये (१४ कामे)

तीर्थक्षेत्र: ७ कोटी ९९ लाख रुपये (६६ कामे)अशी ३४ कोटी ५३ लाख रुपयांची कामे प्रशासकीयदृष्ट्या मंजूर करून नियोजन विभागाकडे निधीकरिता पाठविण्यात आली आहेत. निधी प्राप्त झाल्यानंतर निविदा प्रक्रिया पूर्ण करून कार्यारंभ आदेश देण्यात येणार असल्याचे बांधकाम विभागाकडून सांगण्यात आले.

# गांजाच्या तस्करीसाठी बोलेरोला छुपे कप्पे

## दोन्ही टेल लॅम्पच्या आत व खालील बाजूने विशेष व्यवस्था

## ओडिशातून आणला गांजा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१अमरावती-**

ओडिशा राज्यातून बोलेरो वाहनात गांजा घेऊन अमरावतीत येणाऱ्या दोघांना एलसीबीच्या पथकाने पकडले आहे. तस्करीसाठी वापरलेल्या या वाहनातील टेल लॅम्पच्या आत व खालील बाजूने छुपे कप्पे तयार केल्याचे समोर आले आहे. पोलिसांनी आता हा गांजा ज्याच्यासाठी अमरावतीत येत होता, त्याचा शोध सुरू केला आहे. ही कारवाई गुरुवारी (दि. ३०) रात्री केली.

रवी रामराव राठोड (३६, रा. भिवापूर, तिवसा) आणि आकाश गौतम भडके (३२, रा. वाई बोथ, नांदगाव खंडेश्वर) यांना पोलिसांनी अटक केली आहे. स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस उपनिरीक्षक मुलचंद भांबुरकर हे त्यांच्या पथकासह तिवसा परिसरात गस्त घालत होते.

त्यावेळी एका बोलेरोतून अमरावतीच्या दिशेने गांजा येत असल्याची माहिती मिळाली. त्यामुळे पथकाने मोझरीजवळच्या नवीन बायपासवर नाकाबंदी केली असता एक विना क्रमांकाचे वाहन नागपूरकडून अमरावतीला येताना दिसले. हे वाहन थांबवून रवी राठोड आणि आकाश भडके या दोघांची पोलिसांनी विचारपूस केली असता त्यांनी उडवाउडवीची उत्तरे दिलीत.

त्यामुळे पोलिसांना संशय आला व त्यांनी बोलेरोची झडती सुरू केली. त्यावेळी वाहनात दोन नंबर प्लेट दिसल्या तसेच दोन्ही टेल लॅम्पच्या आतमध्ये गांजा असल्याचे पोलिसांना जाणवले. त्यामुळे दोन्ही टेल लॅम्प काढले, त्यावेळी एका

टेललॅम्पच्या मागे ३५ किलो अशाप्रकारे दोन्ही लॅम्पमागून ७० किलो गांजाचे पॅकेट जप्त करण्यात आले. त्यानंतर आणखी गांजा असल्याची माहिती पोलिसांना असल्यामुळे पोलिसांनी वाहनाच्या खाली जाऊन पाहिले असता विशेष बनवलेले




लोखंडी कप्पे दिसले. त्या कप्प्यातून पोलिसांनी आणखी ३५ किलो अशाप्रकारे एकूण १ क्विंटल ४ किलो ८७९ ग्रॅम

गांजा ज्याची किंमत २० लाख ६६ हजार ९६० रुपये तसेच ५ लाख ५० हजार रुपये असा एकूण २६ लाख १६ हजार ९६० ऐवज जप्त केला आहे. दरम्यान हा गांजा ओडिशातून बोलावणाऱ्याचा एलसीबीने शोध सुरू केला आहे. ही कारवाई एलसीबीचे पीआय किरण वानखडे यांच्या मार्गदर्शनात पीएसआय भांबुरकर व त्यांच्या पथकाने केला आहे.

# बांगलादेशाने वाढवलेले आयात शुल्क: निसर्गाच्या अवकृपेने संत्रा उत्पादकांना ३०० कोटींचा फटका

## संत्रागळीने उत्पादनात यंदा ६०% घट

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१अमरावती**

अमरावती जिल्ह्यातील संत्रा उत्पादकांना यंदा मोठा तोटा झाला आहे. बांगलादेशाने मागील दोन वर्षांत निर्यात शुल्क १८ वरून ८८ रुपये किलोपर्यंत वाढवल्याने निर्यात थांबली. तसेच यंदा निसर्गाच्या लहरीपणामुळे सुमारे साठ टक्के संत्रागळ झाली. संत्रा उत्पादन कमी असल्यामुळे यंदा शेतकऱ्यांना किमान ४५ रुपये दर अपेक्षित होता. मात्र यंदासुध्दा दर ३०-३५ रुपये किलो मिळत आहे. त्यामुळे जिल्ह्यातील शेतकऱ्यांचे यंदा सुमारे ३०० कोटी रुपयांचे नुकसान होत आहे.

अमरावतीच्या संत्र्याला बांगलादेशमध्ये अधिक मागणी होती. मात्र मागील दोन वर्षांपासून बांगलादेशाने भारतातून येणाऱ्या संत्र्यावर असलेले निर्यात शुल्क वाढवलेले आहे. त्यामुळे अमरावतीतून (वरूड, मोर्शी भागातून) बांगलादेशमध्ये जाणारा संत्रा घेऊन जाणे व्यापाऱ्यांनी जवळजवळ बंद केले. कारण आर्थीकदृष्ट्या ते परवडत नाही, असे व्यापारी म्हणतात. त्यामुळे आता भारतातील अंतर्गत बाजारात संत्रा विकण्याशिवाय पर्याय नाही. वास्तविकता यंदा निसर्गाच्या लहरीपणामुळे मृग बहराच्या संत्र्याचे मोठे नुकसान झाले असून ६० टक्के संत्रागळ झाली आहे. त्यामुळे यंदा संत्र्याला किमान ४५ ते ५० रुपये किलो दर शेतकऱ्यांना मिळणे अपेक्षित होते मात्र देशातंर्गत बाजारात संत्र्याला विशेष मागणी नाही.

देशांतर्गत बाजारात फार मागणी नसल्याने अमरावती जिल्ह्याची अवस्था बिकट

जिल्ह्यात दरवर्षी सात ते साडेसात लाख टन संत्रा उत्पादन होते. यंदा मात्र निसर्गाच्या अवकृपेने ते अडीच लाख टनापर्यंत घटले आहे. भाव ३० ते ३५ रुपये प्रतिकिलो मिळत आहे. त्यानुसार ८५० ते ८७५ कोटी रुपये होतात. भाव ४० ते ४५ रुपये प्रतिकिलो मिळाल्यास ही रक्कम ११२५ कोटी रुपयांवर पोहोचली असती मात्र भाव कमी असल्यामुळे शेतकऱ्यांचे किमान सुमारे ३०० कोटी रुपयांचे



नुकसान होत आहे.

शेतकऱ्याला किलोमागे दहा रुपयांचा होतोय तोटा

बांगलादेशाने निर्यात शुल्क वाढवले असून सध्या किलोमागे ८८ रुपये द्यावे लागतात. त्यामुळे व्यापारी संत्रा बांगलादेशमध्ये नेत नाही. यंदा संत्रागळ असल्यामुळे सुमारे ६० टक्के नुकसान झाले आहे. मात्र तरीही संत्राला प्रतिकिलो ३० ते ३५ रुपयेच दर मिळतो आहे. यंदा बांगलादेशमध्ये संत्रा गेला असता तर किमान ४५ रुपये किलोचा दर शेतकऱ्यांना मिळाला असता. यंदा शेतकऱ्यांचे किलोमागे किमान दहा रुपयांचे नुकसान होत आहे. ताज खान मजने खान, उपाध्यक्ष, इंडो बांगला ऑरेंज असोसिएशन, वरूड.

### २-३ वर्षांपूर्वी १.५ लाख टन निर्यात

बांगलादेशमध्ये विक्री परवडत नसल्यामुळे व्यापारी तेथे संत्रा नेत नाहीत, त्यामुळे यावर्षी उत्पादन कमी असूनही यंदा ३० ते ३५ रुपयेच दर मिळत आहे. दोन ते तीन वर्षांपुर्वी जिल्ह्यातून एका हंगामात बांगलादेशमध्ये किमान दीड लाख टन संत्रा जात होता. उरलेल्या संत्र्याला देशांतर्गत बाजारातही मोठी मागणी होती. तशी स्थिती यंदा नाही, असे उत्पादकांचे म्हणणे आहे.

# कृषिपंपांना दिवसा वीज द्या म्हणत नेरपिंगळाईच्या शेतकऱ्यांचे आंदोलन

## महावितरणावर दिली धडक; वीजपुरवठ्याच्या लपंडावाने शेतकऱ्यांना प्रचंड मनस्ताप

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१नेरपिंगलाई–** वीज वितरण कंपनीने दिलेल्या व वेळापत्रकाप्रमाणे नियमित वीज पुरवठा होत नसल्याचा आरोप नेरपिंगळाई येथील शेतकऱ्यांनी केला आहे. रात्री वीज येते, पण शेतात जीव धोक्यात घालून काम करावे लागते. दिवसा वीजपुरवठा मिळेल, अशी शेतकरी आशा करतो, मात्र, दिवसा वीज आली तरी बिघाड होतो आणि त्यानंतर पुन्हा अंधारच होतो. शेती करायची की विजेच्या प्रतीक्षेत बसायचे असा प्रश्न शेतकऱ्यांना पडला आहे. त्यामुळे दिवसा शेतीला अखंडितपणे वीज पुरवठा करावा, या मागणीसाठी शेकडो शेतकऱ्यांनी वीज वितरण कार्यालयासमोर धरणे आंदोलन केले. यावेळी तीव्र नारेबाजी करण्यात आली.



सध्या नेर पिंगळाईसह परिसरातील शेतकऱ्यांना आठवड्यातील कधी दिवसा तर काही रात्री वीजपुरवठा मिळतो. दिवसाला असतानाही वारंवार तांत्रिक बिघाडांमुळे वीजपुरवठा खंडित होतो. त्यानंतर बिघाड दुरुस्तीला वेळ लागतो, तसेच कर्मचारी उपलब्ध नसतात. परिणामी शेतकऱ्यांना खासगी लाइनमनकडूनच दुरुस्ती करून घ्यावी लागते. त्यासाठी मेहनताना व साहित्य खर्च स्वतःच्या खिशातून करावा लागतो. तसेच अनेक डीपीमधील विद्युत तारा लोंबलेल्या आहेत. अनेक डीपीमधील विद्युत साहित्य निकृष्ट दर्जाचे आहे. शेतकऱ्यांना रात्री अपरात्री फ्यूज टाकायला जावे लागते. त्यामुळे प्राणहानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. आधीच खते, औषधे, मजुरी, डिझेल यांचे दर वाढलेले आहेत. त्यात आता वीज पुरवठ्याच्या बिघाडासाठीही खर्च करावा लागतो आहे. शेतकऱ्यांना मोफत वीज नको, पण नियमित आणि दिवसा वीज द्या, अशी मागणी शेतकऱ्यांनी केली आहे. अनेक वेळा रात्रीच्या वीज पुरवठ्यामुळे अपघात, सर्पदंश, मोटारी जळणे, विजेचा धक्का लागणे अशा घटना घडल्या आहेत. दिवसा वीज दिल्यास उत्पादन वाढेल, पिकांना वेळेवर पाणी देता येईल आणि शेतीचा दर्जा सुधारेल. पण शासनाला शेतकऱ्यांच्या जीवाची, त्रासाची काहीच पर्वा नाही. महावितरणच्या अकार्यक्षम व्यवस्थेमुळे शेतकरी हैराण झाले आहेत. वेळापत्रक ठरवले जाते, पण त्या वेळेत वीज नसते. बिघाड दुरुस्तीला तासंतास वेळ जातो. वीज येईल की नाही, हे सांगता येत नाही. त्यामुळे पिकांचे सिंचन करणे धोक्यात आले आहे. त्यामुळे शेतकरी संघटनांनी चर्चा करण्यासाठी उपविभागीय अभियंता मोर्शी दिनेश भागवत, लेहेगाव सब स्टेशनचे अभियंता कल्पेश देवांग तसेच नेरपिंगळाईचे शाखा अभियंता कोकणे यांची भेट घेतली. या वेळी उपअभियंता दिनेश भागवत यांनी शेतकऱ्यांचे प्रश्न समजावून घेऊन दिवसा वीज पुरवठा करण्यासाठी सकारात्मक असल्याचे आश्वासन दिले. या वेळी महाराष्ट्र राज्य किसान सभा राहुल मंगळे, गोपाल श्रीखंडे, बाळू पोटे, मनोज कोकाटे, उमेश कोकाटे, संजय सुने, निखिल वासनकर, अतुल पोटे, अंकुश डेहनकर, प्रमोद शिसट, महेंद्र शिसट, रवी वडनेरकर, अशोक देवळे, प्रभाकर टाकळेसह शेतकरी उपस्थित होते.

---

# बच्चू कडूंचं शिंदे गटात होणार पुनर्वसन – आमदार रवी राणा यांचा दावा

**विदर्भ प्रजासत्ताकदि. १ अमरावती** – प्रहार संघटनेचे नेते आणि आमदार बच्चू कडू लवकरच उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या गटात सामील होणार असल्याचा मोठा राजकीय दावा आमदार रवी राणा यांनी केला आहे. राणा म्हणाले की, कडू यांनी शेतकऱ्यांच्या नावाखाली आंदोलन सुरू केलं असलं, तरी त्यामागचा खरा उद्देश त्यांचा राजकीय पुनर्वसनाचा आहे.राणा यांनी सांगितले की, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे संपूर्ण ताकदीने शेतकऱ्यांच्या पाठीशी आहेत. राज्य सरकारने शेतकऱ्यांच्या मदतीसाठी तब्बल ३२ हजार कोटी रुपयांचा निधी मंजूर केला आहे. सोयाबीन, कापूस, धान, संत्रा, मका आणि ज्वारी अशा पिकांच्या नुकसानीची भरपाई या मदतीतून केली जाणार आहे.



त्यांनी पुढे सांगितले की, शेतकऱ्यांचे सातबारा कर्जमुक्त करण्याची सरकारची प्रक्रिया सुरू असून, त्यासाठी पावले उचलली जात आहेत. तरीदेखील बच्चू कडू आंदोलन करत आहेत. राणा यांनी दावा केला की, कडू यांचा शिंदे यांच्याशी गुवाहाटीपासूनच जुना संबंध आहे.

---

# किशोरनगरात घरफोडी करणाऱ्यास अटक

## १.०७ लाखांचा ऐवज जप्त, तक्रारीवरून फ्रेजरपुरा पोलिसांनी तत्काळ लावला छडा

**दि.१अमरावती–** फ्रेजरपुरा पोलिस ठाण्याच्या हद्दीतील किशोर नगरातील एका घरातून चोरट्याने २९ ऑक्टोबरला सोने–चांदीच्या दागिन्यांसह १२ हजार रुपयांची रोख असा एकूण १ लाख १४ हजार रुपयांचा ऐवज लंपास केला होता. या चोरट्याला फ्रेजरपुरा पोलिसांनी शुक्रवारी अटक करत त्याच्याकडून १.०७ लाखांचा ऐवज जप्त केला आहे.

तेजस पंडित गणवीर (२३, रा. नवाबपुरा, नेर परसोपंत ह. मु. फ्रेजरपुरा, अमरावती) असे या चोरट्याचे नाव आहे. किशोरनगर रहिवासी लक्ष्मण चिंतामण शेलारे यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, लक्ष्मण शेलार व त्यांच्या पत्नी दोघेही नोकरदार आहेत. २९ ऑक्टोबरला सकाळी ११ वाजता घराला कुलूप लावून शेलारे दाम्पत्य नोकरीसाठी घराबाहेर पडले. त्यानंतर रात्री साडेनऊ वाजता शेलार यांच्या पत्नी घरी आल्यात, त्यावेळी घराला लावलेले कुलूप त्यांना दिसले नाही. त्यानंतर त्यांनी घरात जाऊन पाहणी केली असता घरातील लाकडी कपाटातील पाच ग्रॅमची एक लेडीज अंगठी, सोन्याचे झुमके साडेदहा ग्रॅम, दीड ग्रॅम वजनाचे कानातील टॉप्स असे



एकूण १७ ग्रॅम सोन्याचे दागिने व १२ हजार रुपये रोख असा एकूण १ लाख १४ हजार रुपयांचा ऐवज चोरी झाल्याचे त्यांना लक्षात आले. याप्रकरणी ३१ ऑक्टोबरला फ्रेजरपुरा पोलिसांत तक्रार देण्यात आली. तक्रारीवरून पोलिसांनी चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल केला. त्यानंतर ठाणेदार रोशन शिरसाट यांच्या मार्गदर्शनात पीएसआय राहुल महाजन व त्यांच्या पथकाने चोरट्याचा शोध सुरू केला. त्यावेळी संशयाच्या आधारे पोलिसांनी तेजस गणवीरला ताब्यात घेतले. पोलिस चौकशी दरम्यान त्याने या गुन्ह्याची कबुली दिली. त्यानंतर पोलिसांनी त्याच्याकडून शेलारे यांच्या घरून चोरी केलेला सोन्याचा ऐवज तसेच ५ हजार ३६० रुपये रोख जप्त केले आहेत.

---

# ड्रोन आणि स्टिल फोटोग्राफी कार्यशाळेत विद्यार्थ्यांना आधुनिक छायाचित्रण तंत्राची गोडी

## आयआयएमसीत कार्यशाळा : तज्ञांनी केले मार्गदर्शन

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१ अमरावती**

आयआयएमसी च्या विद्यार्थ्यांनी कॅमेरा सेटिंग, फ्रेमिंग, लाइटिंग, कंपोझिशन तसेच ड्रोनद्वारे फोटो आणि व्हिडिओ चित्रीकरणाच्या कौशल्यांचा कार्यशाळेत प्रत्यक्ष सराव केला. या अनुभवातून त्यांच्यात छायाचित्रण बद्दल आत्मविश्वास, सर्जनशीलता आणि गोडी निर्माण होण्यास मदत झाली.



भारतीय जन संचार संस्थानच्या (आयआयएमसी) पश्चिम क्षेत्रीय परिसरात ‘ड्रोन व फोटो पत्रकारिता’ या विषयावर दिनांक ३१ ऑक्टोबर २०२५ रोजी कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. यात लोकमत मीडिया ग्रुपचे छायाचित्रकार मनीष तसरे आणि शहरातील ड्रोन तज्ज्ञ हितेश बोधानी यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. याप्रसंगी क्षेत्रीय संचालक डॉ. राजेश सिंह कुशवाहा, डॉ. विनोद निताळे, डॉ. आदित्य मिश्रा, प्रमोद गायकवाड, जयंत सोनोने, रोहन तायडे उपस्थित होते.कार्यशाळेत प्रथम सत्रात ड्रोन तंत्रज्ञ हितेश बोधानी यांनी आधुनिक पत्रकारितेत ड्रोनचा वाढता वापर, एरियल



शॉट्स घेण्याची पद्धत, ड्रोन उडवताना पाळावयाचे नियम आणि सुरक्षा मानदंड याबद्दल सविस्तर माहिती दिली. त्यांनी विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष ड्रोन ऑपरेशनचे प्रात्यक्षिक दाखवून तंत्रज्ञानाचा अनुभव दिला.

दुसर्या सत्रात मनीष तसरे यांनी कॅमेरा हाताळणीचे तंत्र विस्ताराने समजावून देताना फोटोग्राफी ही केवळ बटण दाबण्याची प्रक्रिया नसून ती विचार आणि दृष्टिकोनातून घडणारी कला असल्याचे सांगितले. उत्कृष्ट छायाचित्रासाठी विषयाचे सखोल ज्ञान, योग्य वेळेचे नियोजन, प्रकाशाचा अभ्यास आणि वाचनाची सवय आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले. याप्रसंगी निवडक छायाचित्रांच्या माध्यमातून बातमी लेखनाचे तंत्र मनीष तसरे यांनी उलगडून संगितले. विद्यार्थांनी ड्रोन द्वारा स्वतः काढलेल्या छायाचित्रांचे आणि व्हिडीओचे सादरीकरण शेवटी करण्यात आले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक व परिचय डॉ. आदित्यकुमार मिश्रा यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. प्रमोद गायकवाड यांनी तर आभार जयंत सोनोने यांनी मानले.कार्यशाळेच्या यशस्वीतेसाठी राजेश झोलेकर, नुरूझुमा शेख, भूषण मोहोकार, राजेश कुमार अनंत नांदुरकर, मंदा पवार, नंदा तुप्पट आदींचे सहकार्य लाभले. कार्यशाळेत मराठी, हिंदी आणि इंग्रजी पत्रकारिता अभ्यासक्रमाचे विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

---

# झोन क्र.४ बडनेरा परिसरात सौंदर्यीकरणाच्या कामांना वेग

## अतिरिक्त आयुक्त शिल्पा नाईक यांची स्थळ पाहणी

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि. १ अमरावती** अमरावती महानगरपालिकेच्या झोन क्र.४ बडनेरा परिसरातील नागरिकांना अधिक स्वच्छ, आकर्षक आणि सुशोभित परिसर मिळावा यासाठी महानगरपालिकेकडून विविध ठिकाणी सौंदर्यीकरणाचे काम हाती घेण्यात आले आहे. या मोहिमेचा शुभारंभ आज अतिरिक्त आयुक्त शिल्पा नाईक यांच्या उपस्थितीत करण्यात आला. अतिरिक्त आयुक्त शिल्पा नाईक यांनी आज स्वतः प्रभाग क्र.२० मधील विविध ठिकाणांची पाहणी केली. पाहणीदरम्यान त्यांनी जैस्वाल बेकरी समोरील जागा, पोलीस कॉलनी परिसर, अंबा



मंगलमजवळील क्षेत्र, तसेच न्यू प्रभात कॉलनीतील गिरी यांचे घराजवळील जागा या ठिकाणांवर चालू असलेल्या किंवा सुरू होणाऱ्या सौंदर्यीकरणाच्या कामांची सविस्तर माहिती घेतली. स्थळ पाहणीदरम्यान अतिरिक्त आयुक्त शिल्पा नाईक यांनी संबंधित अधिकाऱ्यांना तात्काळ काम सुरू करण्याचे निर्देश दिले. तसेच परिसरातील अनावश्यक कचरा, झाडांची छाटणी, भिंतींचे रंगरंगोटी, फुलझाडांची लागवड, बाके बसविणे आणि पादचारी मार्ग सुशोभित करण्यासंदर्भात आवश्यक उपाययोजना राबविण्याचे आदेश दिले. त्यांनी नागरिकांना देखील या मोहिमेत सहकार्य करण्याचे आवाहन केले.यावेळी जेष्ठ स्वास्थ्य निरीक्षक शारदा गुल्हाने, अमरावती शहर समन्वयक श्वेता बोके, स्वास्थ्य निरीक्षक, तसेच खएउ टीमचे प्रतिनिधी उपस्थित होते. संबंधित अधिकाऱ्यांनी सौंदर्यीकरणाच्या आराखड्याची माहिती सादर करत, येत्या काही दिवसांत परिसरातील बदल नागरिकांना दिसून येतील, असे सांगितले.अतिरिक्त आयुक्त शिल्पा नाईक यांनी सांगितले की, अमरावती शहर सुंदर, स्वच्छ आणि हरित बनविणे हे महानगरपालिकेचे प्रमुख ध्येय आहे. प्रत्येक झोनमध्ये नागरिकांच्या सहभागातून सौंदर्यीकरणाची चळवळ उभारली जाणार आहे. या उपक्रमामुळे परिसराचा चेहरामोहरा बदलणार असून नागरिकांना स्वच्छ आणि आकर्षक वातावरण लाभेल. महानगरपालिके च्या ‘स्वच्छ अमरावती – सुंदर अमरावती’ या मोहिमेअंतर्गत या सौंदर्यीकरण उपक्रमांना वेग देण्यात येत आहे. या माध्यमातून शहरातील विविध रस्ते, चौक, सार्वजनिक जागा आणि कॉलन्यांमध्ये सौंदर्यीकरण, रंगकाम, बागायतीकरण तसेच कचरा व्यवस्थापनाचे काम नियोजनबद्ध पद्धतीने केले जाणार आहे.नागरिकांनी या उपक्रमात सहकार्य करत, स्वतःचा परिसर स्वच्छ ठेवण्याचा संकल्प करावा, असे आवाहन महानगरपालिकेकडून करण्यात आले आहे.

---

### कर्जमाफीवरून अजित पवारांचे वादग्रस्त विधान:म्हणाले–

# आम्हाला निवडून यायचे होते म्हणून आम्ही बोललो, तुम्ही कर्ज फेडा ना...

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१पुणे–** राज्यातील शेतकऱ्यांच्या कर्जमाफीच्या मागणीवरून बच्चू कडू आणि राजू शेट्टी यांच्यासह अनेक नेत्यांनी अत्यंत आक्रमक भूमिका घेत महायुती सरकारला कर्जमाफीचा वायदा देण्यास भाग पाडले होते, ज्यानुसार पुढील सहा महिन्यांत कर्जमाफीसाठी समिती गठित करण्यात आली आहे. अशा परिस्थितीत, उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी या मुद्यावर पुन्हा वक्तव्य करून नवा वाद निर्माण केला आहे. आज अजित पवार यांनी, शून्य टक्के व्याजदराने पैसे दिल्यानंतर तुम्ही कर्ज फेडा ना?



असे विधान केले आहे. यापूर्वीही कर्जमाफीसंदर्भात केलेल्या वक्तव्यांमुळे अजित पवार वादाच्या भोवऱ्यात सापडले होते आणि जाहीर सभांमधून त्यांना यावर वारंवार विचारणा झाली आहे. अजित पवार कर्जमाफीवरून बोलताना म्हणाले की, शून्य टक्के व्याजदराने पैसे दिल्यानंतर तुम्ही कर्ज फेडा ना? की सारखे माफ, सारखे फुकट, सारखे माफ, साहेबांनी एकदा कर्जमाफी दिली. आता आम्हाला निवडून यायचे होते म्हणून आम्ही बोललो. त्यासाठी काही पैसे खर्च करावे लागते ना? असे अजित पवार म्हणाले. दरम्यान, अजित पवार यांनी अतिवृष्टीच्या मदतीवरूनही भाष्य केले. ते म्हणाले की, अनेक ठिकाणी नुकसान झाले आहे. पंचनामे वाढत आहेत. ३२ हजार कोटींचा आकडा ४० हजार कोटींवर गेला आहे.

---

# ‘सीसीआय’मार्फत होणाऱ्या कापूस खरेदीची ५.६० क्विंटल मर्यादा हटवा

## शेतकरी संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी दिले जिल्हाधिकारी मीना यांना निवेदन

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१अकोला–** कापूस खरेदी आणि विक्री करण्याचे काम करणाऱ्या सीसीआय (कॉटन कॉर्पोरेशन ऑफ इंडिया–भारतीय कापूस महामंडळ) या केंद्र सरकारच्या संस्थेने कापूस खरेदीची ५ क्विंटल ६० किले प्रती एकरची मर्यादा घातली आहे, असे शेतकरी संघटनेचे म्हणणे आहे. ही मर्यादा हटवण्याची मागणी शुक्रवारी संघटनेचे जिल्हाधिकाऱ्यांकडे केली. याबाबत संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी निवेदन सादर करत चर्चाही केली.

यंदा खरीप हंगामात झालेल्या पावसामुळे सोयाबीन, कापूस, तूर पिकांची हानी झाली. कधी अवर्षण तर कधी अतिवृष्टीमुळे पिकांचे नुकसान झाले. सततच्या पावसामुळे सोयाबीनच्या पिकाला शेंगा न लागल्याचे प्रकारसुद्धा समोर आले. अतिवृष्टीचा फटका फळबागांनाही बसला. शेत जमीनही खरडून गेली. त्यामुळे महसूल, जिल्हा परिषद व कृषी विभागाने संयुक्तपणे केलेल्या पंचनाम्यांचे अंतिम अहवाल तयार करण्यात आले. यात कपाशी पिकाचे प्रचंड नुकसान झाल्याचे दिसून आले. दरम्यान शरद जोशी स्थापित शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष अविनाश पाटील नाकट, सोशल मीडिया राज्य प्रमुख विलास ताथोड, युवा आघाडीचे विदर्भ प्रमुख डॉ. नीलेश पाटील, सदस्य राहुल बहाळे, सतीश सरोदे, गजानन चौधरी यांनी सीसीआच्या कापूस खरेदीबाबत जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन सादर केले.

जून महिन्यात अतिवृष्टीमुळे ४ हजार २१५ हेक्टर क्षेत्रातील पिकांची हानी झाली. ६ हजार १३६ शेतकऱ्यांपैकी ५ हजार १३१ शेतकऱ्यांची माहिती अपलोड झाली आहे. १००५ शेतकऱ्यांची माहिती अपलोडची प्रक्रिया सुरु आहे. मदतीसाठी ६ कोटी ५ लाख ५६हजार मंजूर आहेत. जुलै महिन्यातील अतिवृष्टीचा फटका ७ हजार ३१ हेक्टर क्षेत्रावरील पिकांना बसला होता. ११ हजार ५९७ शेतकऱ्यांपैकि त्यापैकी ८ हजार ५७३ शेतकऱ्यांची माहिती पोर्टलवर अपलोड झाली असून, ३ हजार २४ शेतकरी प्रतिक्षेत आहेत. मदतीसाठी ६ कोटी २१ लाख मंजूर आहेत. ऑगस्ट महिन्यात १ लाख ६ हजार ६४९ हेक्टर क्षेत्रावरील पिकांचे नुकसान झाले. १ लाख २० हजार ६९७ पैकी त्यापैकी ९३ हजार शेतकऱ्यांनी माहिती अपलोड झाली असून, २७ हजार ६९७ शेतकऱ्यांची माहितीची प्रक्रिया सुरू आहे. मदतीसाठी ९२ कोटी मंजूर आहेत. सप्टेंबर महिन्यात २ लाख ९ हजार ४५७ पैकी सुमारे १ लाख ५० हजार शेतकऱ्यांची माहिती मदतीसाठी अपलोड झाली आहे.जिल्ह्यात सीसीआयमार्फत शासकीय कापूस खरेदी सुरू करण्यात येत आहे. या खरेदी प्रक्रियेअंतर्गत सीसीआयने प्रत्येक शेतकऱ्याकडून प्रती एकर फक्त ५ क्विंटल ६० किलो कापूस खरेदी करण्याची अट घातली आहे, असे शेतकरी संघटनेचे पदाधिकारी म्हणाले. मात्र ही मर्यादा अत्यंत तोडकी अव्यवहार्य आणि शेतकऱ्यांसाठी गैरसोयीची आहे. जिल्ह्यातील बहुतांश शेतकऱ्यांचे कापसाचे प्रती एकर उत्पादन हे ५.६० क्विंटल पेक्षा कितीतरी अधिक आहे. ही मर्यादा अत्यंत तोडकी असल्याने शेतकऱ्यांना आपला कापूस विकण्यासाठी खरेदी केंद्रावर अनेक फेऱ्या माराव्या लागतात. वारंवार फेऱ्या मारल्यामुळे शेतकऱ्यांचा वाहतूक खर्च वाढेल व त्यांचा वेळ वाया जातो. सरकारच्या वायदे बंदी, निर्यात बंदी, अनावश्यक आयाती या सारख्या हस्तक्षेपामुळे खुल्या बाजारातील कापसाचे भाव भाव पडलेले आहेत. त्यामुळे खरेदीची मर्यादा हटवण्यात यावी, असे पदाधिकारी म्हणाले. तिवृष्टीने शेतकरी आधीच संकटात सापडला आहे. त्यामुळे परिस्थिती लक्षात घेत शेतकऱ्याचा संपूर्ण कापूस खरेदी करणे, ही सरकारची जबाबदारी ठरते. सीसीआयच्या अटीमुळे खरेदी केंद्रावर अनावश्यक गर्दी होण्याची व खरेदी प्रक्रिया मंदावण्याची दाट शक्यता आहे. शेतकऱ्यांची गैरसोय टाळण्यासाठी आणि कापूस खरेदी प्रक्रिया अधिक सुरळीत करण्यासाठी सीसीआयने कापूस खरेदीची प्रती एकरी ५ क्विंटल ६० किलोची मर्यादा तात्काळ हटवावी, अशी आग्रही मागणी शेतकरी संघटनेने केली


आता आपल्या मोबाईल वरच वाचा
राज्यासह जिल्ह्यातील महत्वाच्या घडामोडी
Q R कोड स्कॅन करा व आमच्या ग्रुप ला जॉईन व्हा!
प्रिंट
पिडीएफ
ई- पेपर
वेबपोर्टल
दररोज रात्री 8 वाजता वाचा
निवांत!!
सांध्य दैनिक
विदर्भ प्रजासत्ताक
https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on
राजकीय,सामाजिक,कृषी,शैक्षणिक,क्रीडा,क्राईम
विश्वातील सर्व घडामोडी वाचा आता आमच्या सोबत